# १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाचे भारतातील निवडक राष्ट्रीय राजकीय पक्षांच्या धोरणावरील परिणाम

**श्री. राजेंद्र शरद जायकर** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**डॉ. टी. एम. पाटील** उपप्राचार्य, सहयोगी प्राध्यापक, सदाशिवराव मंडलीक महाविद्यालय, मुरगुड

..........................................................................................................

**गोषवारा**

पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव यांच्या नेतृत्वात १९९१ साली तंत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी भारतात मुक्त अर्थव्यवस्थेची पाया भरणी केली. २१ जुन १९९१ रोजी पी.व्ही.नरसिंहराव यांनी पंतप्रधान पदाचा पदभार साभाळला तेव्हा देश डिफॉल्टरच्या उभरटयावर होता. परकीय चलनाचा साठा निच्चांकी पातळीवर होता. केवळ १५ दिवसांची आयात करणे शक्य होईल एवढेच परकीय चलन शिल्लक होते. महागाई दर १३टक्के झाला होता. तो १७ टक्क्यांन पर्यंत जाण्याची शक्यता होती. उद्योगधंदे ठ्प्प झाले होते. अशा परिस्थितीत मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार करून भारताला या आर्थिक संकटातून बाहेर काढण्याचे काम तत्कालिन सरकारने केले.

नंतरच्या कालखंडात भारतातील विविध राजकीय पक्षांनी राबवलेल्या आर्थिक धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत लक्षणीय बदल झाले. १९८९ ते २०१४ हा कालखंड आघाडींच्या सरकारचा राहिला. यात प्रामुख्याने कॉंग्रेस प्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडी (UPA)आणि भारतीय जनता पक्ष प्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA)यांचे प्राबल्य राहिले. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर कॉंग्रेस आणि भाजप या दोन पक्षांचा प्रभाव राहिला. सदर शोध निबंधात या दोन राष्ट्रीय राजकीय पक्षांच्या धोरणावर १९९१ च्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्विकारानंतर झालेल्या परिणांमाचा आढावा घेण्यात आला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर राजकीय विचारांचे आणि त्यांच्या आर्थिक विकासावर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच सदर पक्षांचे निवडणूक जाहीरनामे व वेळोवेळी घेतलेल्या भुमिका, स्विकारलेली धोरणे व या सर्वांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर पडलेला प्रभाव यांचा आढावा सदर शोध निबंधात घेण्यात आला आहे.

**पारिभाषिक शब्द** (keywords)

मुक्त अर्थव्यवस्था , आघाडी सरकारे, एनडीए, युपीए, राष्ट्रीय राजकीय पक्ष.

**प्रस्तावना**

१७५७ च्या प्लासीच्या लढाईनंतर ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील राजकीय प्रवासाची सुरवात झाली. १८५८ पासुन ब्रिटीश शासनाची प्रत्यक्ष राजवट भारतात सुरू झाली. या काळात भारतीय अर्थव्यवस्था ग्रामीण समाज केंद्रीत व राष्ट्रीय दृष्टया विकेंद्रीत स्वरूपाची आणि वस्तू व सेवा विनिमयावर अधारित होती. ब्रिटीश राजवटीच्या कालखंडात भारतीय अर्थव्यवस्थेत अमुलाग्र बदल झाले. यामध्ये प्रामुख्याने १) मुद्राविनिमयाचा प्रसार वाढला. २) कृषीक्षेत्रात नगदी पिकांच्या उत्पादनात वाढझाली. सुत, नीळ, ऊस, तंबाखू व तेलबिया यांच्या उत्पादनास प्राधान्य दिले जाऊ लागले. ३)राजकीय एकीकरणासोबत अर्थव्यवस्थेचे एकीकरण होऊन राष्ट्रीय बाजार पेठेच्या निर्मितीस चालणा मिळाली. ४) केंद्रीकृत प्रशासकीय व्यवस्थेची निर्मिती झाली. ५) एकीकृत चलन व्यवस्थेची निर्मितीस चालणा मिळाली.

यासोबत भारतीय खाजगी उद्योगधंदयात वाढ होवून भाडवलदार वर्गाची निर्मिती होऊ लागली. स्वातंत्र्य आंदोलनात सुरू झालेली स्वदेशीची चळवळ, पहिल्या व दुसऱ्या महायुध्दामुळे युरोपातील अर्थव्यवस्था कोलमडल्याने भारतीय उद्योगांच्या विकासाला पोषक वातावरण लाभले. ब्रिटीश राजवटीचे भारतीय अर्थव्यवस्थेला असे काही लाभ झाले. तसेच

ब्रिटीशांच्या स्वार्थी अर्थनीती मुळे भारतात वांरवार पडणारे दुष्काळ, करांचा बोजा यामुळे शेतीवर अवलंबुन असणारा ७२ टक्के भारतीय समाज अत्याधिक गरीबी, बेरोजगारी, निरक्षरता, लोकसंख्येचा विस्फोट, असतुंलित भोजनमान अशा भयानक समस्यांनी ग्रस्त झाली होती.

स्वातंत्र्योत्तर भारताच्या आर्थिक नियोजनाची प्रक्रिया १९५१ साली पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सुरू झाली. तत्पुर्वी १९३४ मध्ये एम.विश्वेशवरैया यांनी Planned Economy For Indiaया पुस्तकात भारताच्या आर्थिक नियोजनाची रूपरेषा मांडली. पुढे १९३८ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना करण्यात आली. जिच्या माध्यामातुन भारताच्या आर्थिक नियोजनाचा मसूदा तयार करण्यात आला. यासोबत स्वतंत्र भारतासाठी विविध विचारसरणीच्या विकास योजना बनविल्या गेल्या. ज्यात प्रामुख्याने महात्मा गांधी यांच्या विचारतुन ग्रामिण समाज केंद्रीत, लघू उद्योगाना प्राधान्य देणारी व राज्याची भुमिका मर्यादित ठेवणारी विकेंद्रीकरणाचा पुरस्कार करणारी अशी होती. तर इतर सर्व योजना राज्यकेंद्रीत होत्या यात प्रामुख्याने बॉम्बे प्लान खाजगीकरण व्यापार स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो. तर पिपल्स प्लान खाजगीकरणावर अंकुश ठेवून समाजवादी भुमिका मांडताना दिसतो.[१]

स्वतंत्र भारताचे नेतृत्व करणाऱ्या कॉग्रेसपक्ष आणि पंडित नेहरू यांच्यावर समाजवादी विचारांचा प्रभाव होता. भारतातील गरीबी व मागासलेपणा दूर करण्यासाठी समाजवादी विचारसरणी योग्य असल्याची भुमिका नेहरूंची होती. तर दुसऱ्या महायुध्दानंतर युरोप व अमेरिकेत भांडवलशाहीचा मोठयाप्रमाणावर विकास झाला होता. या सर्व अनुभवातून मिश्र अर्थव्यवस्थेच्या आधारे भारताचा सामाजिक व आर्थिक विकास साधन्याचे लक्ष निश्चीत करण्यात आले. ज्यात खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांना योग्य स्थान व संधी देण्यात आली. १९९० च्या दशकात ६ व्या ७ व्या पंचवार्षिक योजनामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत मोठया प्रमाणात सुधारणा झाल्या. पुढे १९९० मध्ये सोव्हीयेत रशियाचे विघटन, चीन—व्हिएतनाम सारख्या राष्ट्रांच्या धोरणातील बदल आणि भारतावर आलेल्या आर्थिक संकटाचा सामना करण्याच्या दृष्टीकोणातून १९९१ साली मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार करण्यात आला. ज्यामुळे पुढिल काळात भारतीय समाजकारण, अर्थकारण आणि राजकारण यामध्ये अमुलाग्र बदल झाले. राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर अनेक राजकीय पक्षांच्या ध्येय धोरणामध्ये बदल झाले यापैकी राष्ट्रीय कॉग्रेस पक्ष आणि भारतीय जनता पक्ष यांच्या धोरणावर १९९१ च्या आर्थिक सुधारणांचा झालेला परिणाम सदर शोध निबंधात अभ्यासला आहे.

**उद्दिष्टये**

१) राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाच्या ध्येय धोरणांवर १९९१ च्या नवीन आर्थिक सुधारणांचा पढलेला प्रभाव अभ्यासणे

२) भारतीय जनता पक्षाच्या ध्येय धोरणांवर १९९१ च्या नवीन आर्थिक सुधारणांचा पढलेला प्रभाव अभ्यासणे

**१९९१ पुर्वीचे राष्ट्रीय कॉग्रस पक्षाचे आर्थिक धोरण**

१८८५ साली राष्ट्रीय कॉग्रेंस पक्षाची स्थापना झाली ही भारतीय स्वांतत्र्य चळवळीच्या इतिहासातील अत्यंत महत्वपूर्णघटना होती. भारतीयांच्या आशा अपेक्षा आणि भुमिका ब्रिटीश राजवटीपर्यंत पोहाचवण्यासाठी एक राष्ट्रीय व्यासपीठ देण्याचे कार्य कॉग्रेसने केले. पुढे हीच राष्ट्रीय कॉग्रेस सपुर्ण भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या केंद्र स्थानी राहीली. त्यामुळे स्वतंत्र भारताचे नेतृत्व आणि विकासाची जबाबदारी देखील कॉग्रेसकडे आली. भारतीय जनतेच्या स्वप्नातील सामाजिक, आर्थिक, राजकीय दृष्टया समृध्द भारत घडवण्याच्या दृष्टीने पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली समाजवादी सिध्दांताची कास पकडून मिश्र अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून आत्मनिर्भरता, जमिन सुधारणा, आर्थिक समानता , हरित क्रांती, मोठी धरणे, उद्योगधंदयांचा विकास साधण्याचं प्रयत्न झाले. कॉग्रेस

पक्षाच्या या मिश्र अर्थव्यवस्थावादी नितीचा प्रभाव सुरूवातीच्या काही पंचवार्षिक योजनांमधून आढळून आला तसेच हरीतक्रांती व श्वेतक्रांतीसाठी पायाभरणी करण्याचे काम केले.

१९५६ च्या औद्योगिक निती कायदयाच्या माध्यमातून अवजड उद्योगांवर नियंत्रण ठेवण्याचे सरकाचे नियोजन राहीले. लघू उद्योगांसाठी स्थापन केलेल्या कर्वे समितीच्या माध्यामातून लघू उद्योगांची स्पष्ट व्याख्या करण्यात आली व त्यांच्या शिफारशीच्या आधारे लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात भारतात लोह पोलाद व कोळश्याचे विक्रमी उत्पादन झाले. इंदीरा गांधींच्या नेतृत्वात समाजवादी विचारांचा प्रभाव वाढला बॅकांचे राष्ट्रीयीकरण, तनखेबंदी, जमिन सूधारणा अशा निर्णयामधून हे दिसून येते. १९६७ ते १९७५ हा काळ खाजगी क्षेत्रावरील वाढते नियंत्रण आणि राष्ट्रीयीकरणाच्या प्रभावाचा राहिला.[२]इंदिरा गांधीनी उदारीकरणाविरोधी भूमिका घेवून खाजगी उद्योगांसाठी नवीन परवाना पध्दती आणि इतर निर्बंधांसह सार्वजनिक क्षेत्राचा आक्रमकपणे विस्तार केला. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणाची सुरूवात पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९९० च्या दशकात केली.[३]

१९५० ते १९८० च्या दरम्यान उद्योगांचे राष्ट्रीयीकरण झाले खाजगी उद्योगांसाठी परवानाराज व जाचक नियम व अटीमुळे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले. राजीव गांधी यांनी हे परवाना राज कमी करून सॉफ्टवेअर आणि दुरसंचार उद्योगांच्या वाढीला चालना देवून उदारीकरणाचा पाया घातला. पुढे नरसिंहराव सरकारने १९९१ साली परवानाराज प्रणाली रद्द करून उदारीकरण प्रक्रीया सुरू केली ज्यामुळे सरकारी मक्तेदारी संपवली.भाडवली बाजारात सुधारणा झाल्या परकीय गुतवणुंकदारांना निमंत्रण देण्यात आले, वित्तिय तुट कमी करणे, सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करणे आणि पायाभुत सुविधामध्ये गुंतवणुक वाढवणे हे ध्येय निश्चित करण्यात आले. औद्योगिक परवाण्यांमध्ये कपात करण्यात आली अशा प्रकारे आर्थिक अपरिहार्यतेतून स्विकाराव्या लागलेल्या सुधारणांचा प्रभाव १९९१ नंतरच्या कॉंग्रेसच्या ध्येय धोरणांवर होत राहिला.[४]

**१९९१ नंतरचे राष्ट्रीय कॉंग्रस पक्षाचे आर्थिक धोरण**

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विचारातून निर्माण झालेल्या मिश्र अर्थव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या सत्ता काळातच एवढया मोठया आर्थिक सुधारणा स्विकाराव्या लागल्याने त्यांचे समर्थन करणे आणि फायदे जनतेपर्यंत पोहोवण्याची जबाबदारी कॉंग्रेस पक्षावरच येवून पडली १९९६ च्या पक्षाच्या निवडणूक जाहिरनाम्यात आर्थिक सुधारणांचे फायदे नमुद करण्यात आले परंतु त्यावेळी जनमत या आर्थिक सुधारणांच्या बाजुने राहिले नाही परीणामी या आर्थिक सुधारणांचा मोठा राजकीय फटका राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाला बसला व १९९६ च्या सार्वत्रिक निवडणुकित इतिहासातील सर्वात निच्चांकी जागांसह पराभव करावा लागला.

आजचे कॉंग्रेसचे आर्थिक तत्वज्ञान खुल्या आणि उदारमतवादी बाजाराच्या अर्थव्यवस्थेच्या कल्पणेवर आधारलेले आहे. १९९६ ते २००४ दरम्यान च्या काळात राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष सत्ते बाहेर राहीला. ही पहिलीच वेळ होती की इतका प्रदिर्घकाळ कॉंग्रेस सत्ते बाहेर राहीली. २००४ च्या निवडणूक जाहिरनाम्यात कॉंग्रेसने अर्थव्यवस्था परदेशी गुंणतवणूकीसाठी खुली करण्याचे आणि उद्योगांतील राज्याचे नियंत्रण कमी करण्याची भुमिका घेतली असली तरी सामाजिक कल्याण कार्यक्रम आणि गरीबी व असमानता कमी करण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची वचनबध्दता कायम ठेवली आहे.[५]

२००४ च्या निवडणुकीत कॉंग्रेस प्रणीत युपीए आघाडीला सत्ता प्राप्त झाली. १९९१ च्या आर्थिक सुधारणांचे प्रनेते डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्व खाली सरकार स्थापन करण्यात आले. २००४ ते २०१४ या १० वर्षाच्या काळात कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने भारतीय अर्थव्यवस्था वाढीच्या दृष्टीकोणातून मार्गक्रमण केले. २००३ मध्ये ६१७.७ बिलियण डॉलर असणारी भारतीय अर्थव्यवस्था २०१३ मध्ये १८४१.७ बिलियण डॉलर्स पर्यंत पोहोचली.[६] युपीए च्या पाहिल्या कार्यकाळामध्ये आर्थिक

विकासांचा वेग व पक्षाची लोकप्रियता चांगली राहीली. बहूतेक सर्व आघाडयांवर सरकारची कामगीरी योग्य झाली. मात्र दुसऱ्या कार्यकाळात २जी घोटाळा, कोलगेट घोटाळा, चारा घोटाळा अशा भ्रष्टाचारांच्या आरोपांमुळे कॉंग्रेस पक्षाच्या प्रतिमेला मोठा धक्का बसला व कॉंग्रेस पक्षाला इतिहासातील सर्वात मोठा पराभव पत्करावा लागला. २०१४ व २०१९ च्या जाहिरनाम्यात अर्थव्यवस्था अधिकाधिक मुक्त आणि स्पर्धात्मक बनवणे, परकीय गुंतवणूकीला अनुकुल वातावरण निर्माण करणे, जी एस टी ची अंमलबजावणी अशा गोष्टींचा समावेश करण्यात आला. परंतु या आश्वासणांना जनतेचा प्रतिसाद लाभला नाही.

**१९९१ पुर्वीचीभारतीय जनता पक्षाचे आर्थिक धोरण**

१९९० च्या दशकापासूनच्या भारतीय राजकारणातील प्रमुख राष्ट्रीय राजकीय पक्षांपैकी भारतीय जनता पक्षाचे स्थान महत्वपुर्णठरते. २०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकीत १९८९ पासुन चालत आलेल्या आघाडीच्या सरकारांची परपंरा मोडित काढत पुर्णबहूमताने सत्तेवर येणारा पक्ष म्हणजे भारतीय जनता पक्ष होय. १९५१ साली शामाप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या अखिल भारतीय जनसंघ या पक्षाची आर्थिक विचारसरणी हि सुरवातीपासून स्वदेशी व राष्ट्रवादी अर्थनीतीचा पुरस्कार करणारी राहीलेली आहे.७ पुढे आणीबाणी (१९७५ – ७७) दरम्यान इतर अनेक कॉंग्रेस विरोधी पक्षांसोबत जनसंघ जनता पक्षामध्ये विलीण झाला. १९७७ च्या निवडणुकीत सत्ता प्राप्ती नंतरही पुढील ३ वर्षात जनता पक्षाचे अंतर्गत संघर्षातुन विघटण होवून १९८० साली भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली. अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात निवडणुक लढवलेलया या पक्षाला १९८४ साली लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत केवळ २ जागा मिळाल्या. १९८४ च्या निवडणुक जाहिरनाम्यात सार्वजनिक क्षेत्राला उत्पादक व फायदेशीर बनवने, बहूराष्ट्रीय कॉरपोरेट क्षेत्रातील कंपन्यांच्या मर्यादा निश्चित करणे, स्वदेशी उद्योगधंदयाना चालना देणे, उद्योजकांनी सार्वजनिक हिताचे विश्वस्थ म्हणून कार्य करणे, सार्वजनिक उद्योगांना उत्कृष्ट स्तरावर पोहोचवून सन्मान प्राप्त करून देणे. अशा गोष्टींचा समावेश होता.८

१९८९ च्या निवडणुक जाहिरनाम्यात खाजगी कंपन्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांना कपंनीचे भागधारक बनवने व नफयाचा वाटा मिळवून देणे, सार्वजनिक क्षेत्रासाठी राष्ट्रीय व्यवस्थापन सेवा सुरू करणे, राष्ट्रीय वस्त्रोद्योग धोरण निर्माण करून या उद्योगाला सरकारी संरक्षण देणे अशा पध्दतीची स्वदेशी व राष्ट्रवादी अर्थनीतीची भुमिका पक्षाने घेतली व भाजप हा ८५ जागांसह लोकसभेतील ३ रा सर्वात मोठा पक्ष ठरला.९ पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या १९९१ च्या आर्थिक सुधारणानंतर भारतीय जनता पक्षाच्या आर्थिक धोरणामध्ये अमुलाग्र बदल झाले. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या धोरणाला काही अंशी पाठींबा देणारा विचार प्रवाह पक्षात निर्माण होऊ लागला व त्यामुळे पुढील कालखंडात भारतीय जनता पक्षाचे आर्थिक धोरण बदलत गेले.

**१९९१ नंतरचे भारतीय जनता पक्षाचे आर्थिक धोरण**

१९९२ साली भाजपच्या सर्वोच्च व्यासपीठावर या आर्थिक सुधारणांबाबत तीव्र मतभेद झाले. व्यापक चर्चेनंतर पक्षाने मे १९९२ मध्येHumanistic Approach to Economic Development – A Swadeshi Alternativeअशा शिर्षकाखाली ५४ पानी आर्थिक धोरणाचा स्विकार केला. ज्या व्दारे सार्वजनिक क्षेत्राचे रक्षण, परकीय थेट गुंतवणुकीवर नियंत्रण, कायदेशीर कामगार संघटनांच्या हक्काचे संरक्षण,R.B.Iसाठी वित्तीय शिस्त व स्वायत्ततेची हमी अशा बाबींचा समावेश होता.१०

१९९७ नंतर अटल बिहारी वाजपेय यांच्या नेतृत्वा खाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सत्ता काळात भाजपतील उदारीकरणवादी विचारांचे नेतृत्व आणि स्वदेशी केंद्रीत भुमिका असणारेयांच्यात संघर्ष राहिला. १९९१ च्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या कॉंग्रेस सरकारच्या निर्णयापासून भाजप मध्ये आर्थिक विचारांचासंघर्ष सुरू झाला. १३ मार्च १९९२ रोजी सुरू झालेल्या सारणाथ येथील राष्ट्रीय कार्यकारणीच्या बैठकीचा आर्थिक धोरण हा मुख्य विषय

होता. या बैठकीत कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी त्यांच्या सहयोगी संघटनांशी सल्लामसलत करण्याचा निर्णय झाला.

उदारीकरणानंतरच्या काळातही सुरूवातीस भाजपची स्वदेशी मोहिम प्रभाविपणे चालवली गेली. १९९६ च्या भाजपच्या निवडणूक जाहिरणाम्यात या गोष्टींचा स्पष्ट उल्लेख केला आहे. लघू उद्योगांच्या वाढीवर लक्ष केंद्रीत केले आहे.[११]

वाजपेयींच्या नेतृत्वाखाली भाजपची स्वदेशी मोहीम हळूहळू मवाळ झाली. भाजपच्या १९९९ च्या निवडणूक जाहीरनाम्यात असे नमुद करण्यात आले की पक्ष परकीय गुतवणूकीचे स्वागत करतो. राजकीय परीस्थितीमुळे पक्षाच्या आर्थिक विचारसरणीत उत्क्रांती झाली. सत्तेवर आल्यानंतर वाजपेयींनी विमा, माध्यमे सारखी काही क्षेत्रे परकीय गुंतवणूकीस खुली केली.[१२]

२००४ नंतर विरोधी पक्षात असताना भाजपने तत्कालीन कॉंग्रेस सरकारच्या अनेक धोरणांवर टिका केली. आर्थिक उदारीकरणाचा निषेध केला कॉंग्रेसकडून प्रस्तावित रिटेल क्षेत्रातील परकीय गुंतवणूकीस अक्षेप घेतला.

नरेंद्र मोदींकडे भाजपचे नेतृत्व आल्यापासून पक्ष आणि सरकार या दोन्हीवर त्यांचे नियंत्रण राहिल्यचे दिसते. त्यांना हव्या त्या प्रकारची आर्थिक धोरणे राबवण्याची मोकळीक त्यांना असल्यामुळेच नोटबंदी, GSTची अंमलबलावणी, खाजगीकरण, परकीय गुणतवणूकीसाठीचे प्रयत्न अशा गोष्टी घडताना दिसतात. हा मोठा बदल भारतीय जनता पक्षाच्या ध्येय धोरणांमध्ये झालेला दिसतो.

२०१३ साली उद्योग अनुकुल भुमिका असणाऱ्या नरेंद्र मोदींना पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून घोषित केल्यानंतर २०१४ च्या जाहिरणाम्यात खाजगी क्षेत्रासाठीची बंधने दूर करण्याचे आश्वसन देण्यात आले. ज्यामुळे भारतीय कंपण्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करणे सोपे होईल. आज मोदी सरकारने अनेक सरकारी क्षेत्रांमध्ये FDIची मर्यादा वाढवली आहे. परदेशी गुंतवणूक दारांवरील नियमाकभार कमी केले आहेत. अनेक भाजपाशसित घटक राज्यांमध्ये कठोर कामगार कायदयांमध्ये सुधारणांसह व्यावस्था अनुकुल नियम स्विकारले आहेत.

२०१६ च्या ऑगस्ट महिन्यात भाजप सरकारणे नोटबंदीचा निर्णय अचानकपणे जाहिर केला. चलनातील जवळपास ८६ टक्के (मुल्यानुसार ) नोटा बंद करण्यात आल्या. काळा पैसा बाहेर काढणे, बनावट चलनास आळा घालणे, व्यवहारातील रोखीच्या व्यापारावर नियंत्रण करणे. अशा उद्दीष्टासाठी घेतलेल्या या निर्णयात फारसे यश आल्याचे दिसत नाही.

याच काळात GSTची अमलबजावणी करण्यात आली.GSTने अनेक अप्रत्यक्ष करांच्या श्रेणीला एकसंघ मुल्यावर्धित करात एकत्र केले. मेक इन इंडिया उपक्रमाच्या माध्यमातून देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे व परदेशी गुंतवणूक आकर्षीक करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

अशा प्रकारे भारतीय जनता पक्षाच्या आर्थिक ध्येय धोरणांमध्ये १९९१नंतरकाळाणूरूप बदल होत गेले. त्यांचा स्वदेशीचा अजेंडा आज काही अंशी मागे पडला आहे. १९९१ च्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्विकारानंतर पक्षाने देखिल एन डी ए आघाडी सरकारच्या काळात सहकारी पक्षांच्या संबंधातील अपरीहार्यतने स्विकारलेल्या भुमिका आज अधिकृतपणे आणि पुर्ण बहूमतासह सत्तेत आल्यावरही भाजपने स्विकारलेली दिसते.

**निष्कर्ष**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात १९९१ च्या आर्थिक सुधारणा या भारतातील राजकीय पक्षाच्या विचारधारांमध्ये अमुलाग्र बदल घडवणाऱ्या ठरल्या.प्रमुख पक्षाच्या राजकीय स्पर्धा आर्थिक सुधारणांसाठी पोषक ठरतात. १९८९ ते २०१४ या काळातील आघाडी सरकारांमधील उल्लेखनिय बाब म्हणजे राजकीय सत्तेच्या अनियंत्रित वापर

करण्याची गैरसोय सत्तेतील प्रमुख राजकीय पक्षांची झाली. राजकीय पक्षांचे अस्तित्व धोक्यात येते तेव्हा त्यांना आर्थिक कामगिरी सुधारणारी धोरणे राबवणे सक्तीचे होते.

२१व्या शतकाच्या सुरवातीस भावनिक, सामाजिक कार्यक्रमांव्यतिरिक्त आर्थिक सुधारणांचे आश्वासन देण्याची स्पर्धा प्रमुख राजकीय पक्षांच्या नेतृत्वात सुरू झाल्याचे दिसते.भारतीय जनता पक्षाच्या जाहीरनाम्यातील राममंदिर, कलम ३७०, समान नागरी कायदा या गोष्टी काही काळ बाजूला ठेवून रोजगार रोजगार, भ्रष्टाचार, आर्थिक सुधारणा, महागाई या मुद्द्याच्या आधारे १९९९ ते २०१४ पर्यंतच्या निवडणुका लढवल्याचे दिसते.

१९९१ नंतर राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने समाजवादाची छबी सोडून जागतीक स्पर्धेच्या काळात आर्थिक ध्येयधोरणांमध्ये मूलगामी बदल केले. जे देशाचे तसेच पक्षाचे अस्तित्व टिकऊन ठेवण्यास आवश्यक होते.

**संदर्भ**

१.Indian Economics Policy,Edited By Dr. Dilfraz SinghUSI Publications, New Delhi,
Lovely Professional University, Phagwara.

२.https://www.britannica.com/place/India/Politics-and-the-economy

३.https://business.mapsofindia.com/india-economy/political.html

४. Election Manifesto of Indian National Congress General Election (Lok Sabha) 1996 https://www.rediff.com/news/1996/cong.htm

५. Election Manifesto of Indian National Congress General Election (Lok Sabha) 2004 https://ia800904.us.archive.org/30/items/CongressManifesto2004/Congress%20Manifesto%202004.pdf

६. Election Manifesto of Indian National Congress General Election (Lok Sabha) 2014 https://cdn.inc.in/manifestos/pdf_documents/000/000/001/original/Manifesto-2014.pdf?1506426027

७. History of Bharatiya Janata Party https://en.wikipedia.org/wiki/Bharatiya_Janata_Party#:~:text=In%20April%201980%2C%20shortly%20after,as%20the%20Bharatiya%20Janata%20Party.

८. Election Manifesto of Bharatiya janata Party General Election (Lok Sabha)1984 https://library.bjp.org/jspui/handle/123456789/237

९. Election Manifesto of Bharatiya janata Party General Election (Lok Sabha)1989 https://library.bjp.org/jspui/handle/123456789/238

१०. BJP's economic model, The Hindu, e-paper,October 22, 2019https://www.thehindu.com/opinion/letters/bjps-economic-model/article29760748.ece

११.Election Manifesto of Bharatiya janata Party General Election (Lok Sabha)1996 https://library.bjp.org/jspui/bitstream/123456789/261/1/BJP%20ELECTION%20MANIFESTO%201996.pdf

१२.https://carnegieendowment.org/2019/04/04/hindu-nationalism-and-bjp-s-economic-record-pub-78720